**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.२९६९ दि. ०९/०९/२०१९**

**पोलीस स्टेशन- येरवडा पोलीस स्टेशन, पुणे**

**येरवडा पोलीस स्टेशनकडून आयुर्वेदिक पंचकर्म क्लिनीकचे नावाखाली चालणारे वेश्याव्यवसायाचे ठिकाणी कारवाई करून २ महिलांची सुटका केली.**

---

दिनांक ०८/०९/२०१९ रोजी येरवडा पोलीस स्टेशनकडील स.पो.फौ. बाळू बाहिरट यांना बातमी मिळाली की, “अमृत पार्क तिसरा मजला कल्याणीनगर कॉर्नर येरवडा पुणे येथील अव्हिवा पंचकर्म क्लिनीक येथे पंचकर्म च्यानावाखाली वेश्या व्यवसाय चालत आहे” अशी बातमी सदरची बातमीत्यांनी येरवडा पो.स्टे.चे व.पो.निरी.श्री.युनूस शेख यांना कळविली असता त्यांनी लागलीच स्टाफकरवी एक बनावट गि-हाईक व पंचांना बोलावून घेवून बातमीचा आशय कळवून बनावट गि-हाईकास बातमीचे ठिकाणी पाठविले. बनावट गि-हाईकाकरवी खात्री होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. युनूस शेख यांनी महिला पोलीस अधिकारी, कर्मचारी, इतर स्टाफ व पंचां समक्ष सदर ठिकाणी रात्रौ १८:३५ वा. छापा टाकून कारवाई केली आहे. सदर ठिकाणी क्लिनीक चालक महिला आरोपी ही अन्यदोन महिलांकडून आयुर्वेदिक पंचकर्म क्लिनीकचे नावाखाली वेश्या व्यवसाय करवून घेत असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर कारवाईमध्ये मिळालेल्या २ महिलांची पोलीसांनी सुटका केलेली आहे. पो.हवा. ४५९० बाळासाहेब आप्पासाो. गायकवाड, येरवडा पो.स्टे. पुणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून येरवडा पो.स्टे.येथे गुन्हा रजि.नं. ६३२/२०१९ अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधकायदा १९५६ चेकलम ३,४,५ प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आलेला आहे. सदर गुन्ह्यामध्ये वरील महिला आरोपीस अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा तपास श्री.अजय वाघमारे, पो.निरी.(गुन्हे), येरवडा पो.स्टे. हे करीत आहेत.

सदरची कारवाई ही मा.श्री.सुनिल फुलारी साो. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, पुणे, मा.श्री.प्रसाद अक्कानवरु साो. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-४, पुणे व मा.श्री.रामचंद्र देसाई साो. सहा.पोलीस आयुक्त, येरवडा विभाग, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पोलीस स्टेशनचे युनूस शेख, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, महिला पोलीस उप-निरी.शुभांगी मगदुम,स.पो.फौ. बाळासाहेब बहिरट, पो.हवा. ४५९० बाळासाहेब गायकवाड, पो.हवा. ५६६४ के.व्ही.खुडे, पो.ना.४११० पंकज मुसळे, पो.शि. ७६५४ विष्णू सरवदे, पो.शि. ७२८० शरदबांगर, पो.शि. ७८०५ नवनाथ कारखिले, म.पो.शि. ११०४८ मनिषा बाबर,यांनी केलेली आहे.